**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ४७०/२०१७ मधील</u>**
**<u>अर्ज (निशाणी क्रमांक ४७) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००६९५-२०१७)

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ अन्वये दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे :- त्याने प्रस्तुतचा दावा, जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी, त्याचा मुलगा, सुना व नातवंडे असे त्यांचे एकत्र कुटुंब आहे. वादीचा मुलगा कैलास संपत आहेर हा सतत त्याच्यासोबत दावा दाखल करतेवेळी हजर होता, त्यामुळे त्याला सदर दाव्याची संपुर्ण माहिती आहे. वादी हा दावा दाखल करतेवेळी शारीरीक दृष्टया चांगला होता परंतु त्याचे वय झाल्याने त्याला कमी ऐकु येते त्यामुळे तो साक्ष देवु शकत नाही. वादीच्या मुलाला दाव्याची संपुर्ण कल्पना आहे तसेच तो साक्ष देण्यास सक्षम आहे त्यामुळे त्याच्या मुलास साक्ष देण्याची परवानगी दयावी अशी विनंती वादीने केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सदर अर्जास त्याचा अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, सदरचा अर्ज कायदेशिर नाही. वादीने अर्ज कोणत्या तरतुदीखाली दिला आहे याचा उल्लेख केलेला नाही. इतकेच नव्हे तर वादीला कमी ऐकु येते याबाबतचा देखील कोणताही वैद्यकीय दाखला अभिलेखावर दाखल केला नाही. सबब, अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचले व दाखल कागदपत्रे पडताळुन पाहिली असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे, त्याने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ प्रमाणे दाखल केला आहे. वादीला वृद्धापकाळामुळे कमी ऐकु येते त्यामुळे त्याच्यावतीने त्याच्या मुलाला साक्ष देण्याची परवानगी दयावी. वादीतर्फे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे परंतु त्यामध्ये ऐकु न येण्याचे प्रमाण कमी प्रमाणात आहे असे नमुद केलेले आहे. वादीतर्फे त्याच्या मुलाला साक्ष देण्याकरीता इतर कायदेशिर पर्याय उपलब्ध आहेत. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ प्रमाणे दाखल केला आहे परंतु आदेश ३२ प्रमाणे जर दावा हा अज्ञान व्यक्तीच्या विरुद्ध अथवा त्याच्यावतीने तसेच मानसिक दृष्टा आजारी असलेल्या

व्यक्तीच्या वतीने अथवा विरूद्ध असेल तर त्याचा मित्र म्हणुन (next friend) त्याच्या जवळच्या व्यक्तीची नेमणुक करता येते. सदर अर्जामध्ये आदेश ३२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणतीही बाब नमुद नाही. वादी हा अज्ञान नाही किंवा मनोरूग्ण नाही. अशा परिस्थितीमध्ये, वादी म्हणुन त्याच्या मुलाला साक्ष देण्याची परवानगी देता येणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

BABAR SANGITA PUNDLIK
Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2024.04.22 13:07:19 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २२.०४.२०२४.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.